दैनिक

# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com

Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शुक्रवार, दि. १० जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ८० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## घटस्फोट न घेताच पोलीस कर्मचाऱ्याचे दुसरे लग्न; आलेल्या पत्नीला बेदम मारहाण

**हिंगोली :** पोलीस कर्मचाऱ्यानेच कायद्याचे उल्लंघन केल्याची धक्कादायक घटना हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे समोर आली आहे. नांदेड पोलीस दलात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्याने पहिल्या पत्नीची संमती आणि कायदेशीर घटस्फोट न घेता दुसरे लग्न केल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे, हे लग्न रोखण्यासाठी मंडपात पोहोचलेल्या पहिल्या पत्नीला सर्वांसमोर बेदम मारहाण करण्यात आल्याचा आरोप असून, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे.


**पाहिजेत**

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


# कर्नाटकमध्ये भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू, दोन जखमी



**यल्लापूर (कर्नाटक) 09 जुलै (हि.स.) :** उत्तर कन्नड जिल्ह्यातील यल्लापूर तालुक्यात अरबैल घाटाजवळ गुरुवारी पहाटे मल्टी-युटिलिटी वाहन (एमयूव्ही) आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण अपघातात धारवाड येथील 7 जणांचा जागीच मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

यासंदर्भातील माहितीनुसार अपघातात मृत्यूमुखी पडलेले सर्वजण धारवाडचे रहिवासी असून, बुधवारी (8 जुलै) रात्री ते एमयूव्हीद्वारे धर्मस्थळ आणि इतर धार्मिक स्थळांच्या दर्शनासाठी निघाले होते. पहाटेच्या सुमारास अरबैल घाट परिसरात त्यांच्या वाहनाची ट्रकशी जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की एमयूव्हीचा पूर्णपणे चुराडा झाला. यामध्ये कारमधील 7 जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये वाहनचालक संजय अंगडी , बसवराज , अभिषेक ईश्वर, अक्षय, अभिषेक आणि मंजूनाथ चुलकी यांचा समावेश आहे. सातव्या मृत व्यक्तीची ओळख अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेली नाही.दुर्गाप्पा मडिवाळ, चन्नबसय्या संपगाव आणि सचिन हे या अपघातात गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे बोलले जाते.

अपघाताची माहिती मिळताच यल्लापूर पोलिस आणि महामार्ग पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी जखमींना तातडीने रुग्णालयात हलवून बचावकार्य सुरू केले. वाहनाचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाल्यामुळे मृतदेह बाहेर काढण्यासाठी बचाव पथकाला मोठी कसरत करावी लागली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. अपघातातून बचावलेल्या शिवराज यांच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम 281 (सार्वजनिक रस्त्यावर निष्काळजीपणे वाहन चालविणे), कलम 125(2) (इतरांच्या जीवितास किंवा वैयक्तिक सुरक्षिततेस गंभीर धोका निर्माण करणे) आणि कलम 106(1) (निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत ठरणे) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


## न्यायालयाचा आदेश; पार्थ पवारांच्या कंपनीचा दस्त रद्द

**पुणे :** पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन प्रकरणात महत्त्वाचा न्यायालयीन निर्णय देण्यात आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीच्या नावावरील ४० एकर जमीन खरेदीचा दस्त न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे पुन्हा एकदा या वादग्रस्त व्यवहाराची चर्चा सुरू झाली आहे.

मुंढवा येथील सुमारे ४० एकर सरकारी मालकीची जमीन बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. या जमिनीचा सुमारे ३०० कोटी रुपयांचा खरेदी व्यवहार अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीसोबत करण्यात आला होता. मात्र, या जमिनीचे बाजारमूल्य जवळपास १,८०० कोटी रुपये असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या व्यवहारात आयटी पॉलिसीतील तरतुदींचा गैरवापर करून सुमारे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क टाळण्यात आल्याचा आरोप आहे.

# मराठवाड्यात मध्यरात्री भूकंपाचे सलग 4 धक्के

## नांदेड, हिंगोली आणि परभणीत भीतीचे वातावरण



**नांदेड, 09 जुलै :** राज्याच्या मराठवाडा विभागातील नांदेड, हिंगोली आणि परभणी जिल्ह्यांमध्ये गुरुवारी मध्यरात्रीनंतर भूकंपाचे सलग 4 धक्के जाणवले. रात्री 1.37 ते 3.23 या कालावधीत हे धक्के बसले असून, रिक्टर स्केलवर त्यांची तीव्रता 3.6 ते 4.6 दरम्यान नोंदविण्यात आली. सुदैवाने या भूकंपामुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

प्राथमिक माहितीनुसार, पहिला धक्का रात्री 1.37 वाजता सिरली–पांगरा शिंदे गावाजवळ जाणवला. या धक्क्यामुळे नागरिकांची झोपमोड झाली आणि भीतीपोटी अनेकांनी घराबाहेर धाव घेतली. या भूकंपाचे केंद्र जमिनीखाली सुमारे 10 किलोमीटर खोलीवर असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर रात्री 2.15 वाजता ककडधाबा गावाजवळ दुसरा धक्का जाणवला. त्याची तीव्रता 3.6 इतकी नोंदविण्यात आली. त्यानंतर अवघ्या दोन मिनिटांनी, 2.17 वाजता तिसरा आणि 3.23 वाजता चौथा धक्का जाणवला. भूकंपाचे धक्के जाणवताच अनेक नागरिक घाबरून घराबाहेर पडले. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अवघ्या दोन तासांच्या आत चार वेळा भूकंपाचे धक्के जाणवले.

यापूर्वी याच वर्षी एप्रिल महिन्यात हिंगोली परिसरात 4.7 तीव्रतेचा भूकंप झाला होता. त्यावेळी पांगरा शिंदे गावातील काही घरे आणि सामुदायिक सभागृहाला तडे गेले होते. तसेच नांदेड, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर आणि परभणी परिसरातही भूकंपाचे धक्के जाणवले होते.

## थोडक्यात वार्ता

### बंगालच्या उपसागरातील ढग निवळले, पावसाचा जोर ओसरणार

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून थैमान घालणाऱ्या पावसाचा जोर आता हळूहळू कमी होताना दिसत आहे. मात्र, अद्यापही काही जिल्ह्यांत पावसाचा धोका कायम असून, पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यासाठी भारतीय हवामान विभागाने गुरुवारी (९ जुलै) 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. पुणे आणि सातारा घाटमाथ्यावर अतिजोरदार पावसाची शक्यता असल्याने स्थानिक प्रशासनाला आणि नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. तर उर्वरित कोकण किनारपट्टी, घाटमाथ्यातील काही भाग आणि उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांसाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. बंगालच्या उपसागरातील ढगांची संख्या कमी झाल्यामुळे, पुढील काही दिवसांत उर्वरित राज्यात पावसाची उघडीप मिळण्याची शक्यता आहे. आता पाऊस प्रामुख्याने स्थानिक हवामानानुसार पडेल. गेल्या २४ तासांत कोकण आणि घाटमाथ्यावर पावसाचा जोर प्रचंड होता. अनेक ठिकाणी ३०० मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. राज्यातील सर्वाधिक पाऊस घाटमाथ्यावरील ताम्हिणी (५३० मिमी) येथे झाला. सोलापूरमध्ये राज्यातील उच्चांकी ३२ अंश सेल्सिअस तापमान, तर महाबळेश्वरमध्ये नीचांकी १८.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवण्यात आले.

### माजी सरकारी अधिकाऱ्याच्या घरात 'कुबेराचा खजिना'



**उत्तर प्रदेश:** उत्तर प्रदेशातील आग्रा येथे एका माजी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याच्या घरावर टाकलेल्या छाप्यात कोट्यवधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता उघडकीस आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (व्हिजिलन्स) कारवाईदरम्यान घरातून मोठ्या प्रमाणात सोनं, चांदी, रोख रक्कम आणि स्थावर मालमत्तेची कागदपत्रे जप्त करण्यात आली. तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, माजी अधिकारी ललित कुमार यांच्या निवासस्थानी छापा टाकल्यानंतर सुमारे २२ किलो सोन्या-चांदीचे दागिने, विटा आणि बिस्किटे सापडली. यामध्ये सुमारे १३ किलो सोनं आणि ९ किलो चांदीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे. याशिवाय घरातून १.६२ कोटी रुपयांची रोख रक्कमही जप्त करण्यात आली. विविध ठिकाणी ठेवलेल्या नोटांच्या बंडलांची मोजणी करण्यासाठी तपास यंत्रणेला मोठी मेहनत घ्यावी लागली.

### पुण्यातील कचरा डेपो दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील एका तरुणाचा मृत्यू

**जळगाव :** पुण्यातील पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथे कचऱ्याचा डोंगर इमारतीवर कोसळून एक अत्यंत भीषण दुर्घटना घडली. या दुर्दैवी अपघातात अनेकांचा मृत्यू झाला असून, मृतांमध्ये जळगाव जिल्ह्यातील एका तरुणाचा समावेश असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.जळगाव तालुक्यातील शिरसोली येथील रहिवासी असलेले भावेश मोहन वाणी (वय ३३) यांचे या दुर्घटनेत दुर्दैवी निधन झाले. भावेश हे सध्या नोकरीनिमित्त पुण्यात स्थायिक होते. त्यांच्या मृत्यूचे वृत्त समजताच मूळ गाव असलेल्या शिरसोली परिसरासह जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात असून संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

# हिवाळी अधिवेशनात समान नागरी कायद्याचा मसूदा आणणार ! - मुख्यमंत्री



**मुंबई, ९ जुलै :** नागपूर येथे होणाऱ्या आगामी हिवाळी अधिवेशनामध्ये समान नागरी कायद्याचे विधेयक आणण्यासाठी प्रयत्न करू, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, गुरुवारी विधानसभेत दिली. या कायद्याचा मसूदा तयार करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची माहितीही फडणवीस यांनी दिली.

भारताच्या संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून राज्यात 'समान नागरी कायदा' (युसीसी) लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये या कायद्यासाठी समिती स्थापन करण्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत केली. या समितीने पुढील सहा महिन्यांत आपला अहवाल सादर करणे अपेक्षित असून, राज्य सरकारचा असा प्रयत्न असेल की, आगामी हिवाळी अधिवेशनातच हा कायदा दोन्ही सभागृहांच्या पटलावर आणला जावा.

निवृत्त न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश आर्.सी. चव्हाण, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस्.जी. मेहेरे, राज्याचे माजी मुख्य सचिव डी.के. जैन, राज्याचे माजी महाधिवक्ता वीरेंद्र सराफ, राज्यघटनेचे अभ्यासक पद्मश्री रमेश पतंगे, शिक्षणतज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुवर्णा रावल यांचा समावेश आहे.



नांदेड : येथील भुंकपाचा का भ्रष्टाचाराचा प्रताप? एका वर्षात पुलाची लागली वाट, धन्य ते ठेकेदार व त्यांना काम देणारे नेते व अधिकारी..

# नवजात बालकाला नाल्यात फेकणाऱ्या मातेला तीन वर्षांची सक्तमजुरी


**जळगाव, 09 जुलै :** चोपडा तालुक्यात चार वर्षांपूर्वी नवजात बालकाला नाल्यात टाकून देण्याच्या धक्कादायक आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या प्रकरणात अमळनेर जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा निकाल दिला आहे. आरोपी जन्मदात्या मातेला न्यायालयाने तीन वर्षांची सक्तमजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश छाया पाटील यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

ही घटना ६ ऑगस्ट २०२२ रोजी चोपडा तालुक्यातील एका गावात घडली होती. गावात उत्तरकार्याचा कार्यक्रम सुरू असताना काही ग्रामस्थांना नाल्याजवळ नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यांनी तात्काळ याची माहिती पोलिस पाटलांना दिली. पोलिस पाटील घटनास्थळी पोहोचले आणि कापडात गुंडाळलेल्या अवस्थेतील बालकाला बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर चोपडा ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मदतीने गावातील नुकत्याच प्रसूत झालेल्या महिलांची पडताळणी करण्यात आली. त्यावेळी कोणतीही अधिकृत नोंदणी नसताना एका महिलेची नुकतीच प्रसूती झाल्याचा संशय आल्याने तिची चौकशी करण्यात आली. चौकशी दरम्यान संबंधित महिलेने नवजात बालकाला नाल्यात फेकून दिल्याची कबुली दिल्यानंतर तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.या प्रकरणाची सुनावणी अमळनेर जिल्हा व सत्र न्यायालयात झाली. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. किशोर बागूल यांनी पोलिस पाटील, आशा सेविका, डॉक्टर यांच्या साक्षी तसेच डीएनए अहवालासह भक्कम पुरावे न्यायालयासमोर सादर केले. या पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी महिलेला तीन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली.

# उपकर निधीतून जिल्हा परिषद शाळा दुरुस्त करा; 14.50 कोटींच्या खर्चावर शिवसेनेचा सवाल

## गटनेते राधाकृष्ण पाठाडे यांची मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांच्याकडे मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा परिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील फर्निचर व वीज जोडणीसाठी प्रस्तावित १४.५० कोटी रुपयांचा खर्च थांबवून तो निधी जिल्ह्यातील जीर्ण झालेल्या जिल्हा परिषद शाळांच्या दुरुस्ती व विकासासाठी वापरण्यात यावा, अशी ठाम मागणी शिवसेना गटनेते राधाकृष्ण पाठाडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांची भेट घेऊन केली.

पाठाडे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सुमारे ३९१ ते ४०० जिल्हा परिषद शाळांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. अनेक शाळांच्या इमारती ५० ते ६० वर्षांपूर्वीच्या असून काही ब्रिटिशकालीन इमारती आजही वापरात आहेत. गळके छत, भिंतींना पडलेल्या भेगा, मोडकळीस आलेल्या वर्गखोल्या, साप-विंचूंचा वावर आणि छत कोसळण्याचा धोका अशा गंभीर समस्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

त्यांच्या मते, नवीन प्रशासकीय इमारतीतील फर्निचर व वीज जोडणीसाठी सरकारकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करून घ्यावा. मात्र उपकर निधीतील उपलब्ध रक्कम ही शाळांचे नूतनीकरण,


-> पान 2 वर


# जिंतूरच्या रस्त्यांची दुरवस्था; जबाबदारी कोणाची?; मुख्य मार्गांवरील खड्ड्यांनी नागरिक हैराण

## सार्वजनिक बांधकाम विभाग आणि न.प.च्या समन्वयाचा अभाव उघड

हिंदू प्रकाशवार्ता : सचिन रायपत्रीवार





**जिंतूर :** शहरात झालेल्या अल्पशा पावसानंतर जिंतूर शहरातील प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. ठिकठिकाणी पडलेले मोठमोठे खड्डे, त्यामध्ये साचलेले पाणी आणि चिखलामुळे वाहनचालकांसह पादचारी व विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

शहरातील येलदरी रोड, साखरतळा चौक ते संत भगवान बाबा चौक तसेच मध्यवर्ती मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण पूर्णपणे उखडले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.

येलदरी रस्त्यावरील खड्डे तर हुतात्मा स्मारक परिसरातील रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने नागरिकांची गैरसोय अधिक वाढली आहे. येलदरी या मार्गावरून दररोज हजारो नागरिक, व्यापारी, शालेय विद्यार्थी आणि रुग्णालयाकडे जाणारे रुग्ण प्रवास करतात. दुसरीकडे मात्र हुतात्मा रस्त्याचे काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

या भागातील अनेक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसाच्या पाण्यातून आणि चिखलातून वाट काढावी लागत आहे. शाळकरी मुलांना तसेच पालकांना दररोज मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून संबंधित विभाग मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

**हुतात्मा स्मारक परिसरातील रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून नागरिकांची अडचण दूर करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे. मात्र प्रत्यक्षात कामाला अपेक्षित गती मिळणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.**

**- नगराध्यक्ष प्रताप देशमुख**

नागरिकांच्या मते, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपरिषद यांच्यातील समन्वयाचा अभाव हीच या परिस्थितीची प्रमुख कारणे आहेत. रस्त्यांचे खोदकाम झाल्यानंतर ते तातडीने दुरुस्त न

**जिंतूरसारख्या वाढत्या शहरात दर्जेदार रस्ते ही मूलभूत गरज आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्यांची दुरुस्ती आणि देखभाल होणे अपेक्षित असताना, आज नागरिकांना खड्डे, चिखल आणि वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने जबाबदारी एकमेकांवर ढकलण्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभाग, नगरपरिषद आणि संबंधित यंत्रणांनी समन्वय साधून तातडीने रस्ते दुरुस्तीची कामे पूर्ण करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच यंत्रणा जागी होईल, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.**

## "शाल जोडे"



# संपादकीय

## धरणीकंप आणि आपत्कालीन सज्जतेचा इशारा

मराठवाड्याच्या उत्तर भागात अवघ्या दोन तासांच्या कालावधीत लागोपाठ जाणवलेले भूकंपाचे सलग चार धक्के हे भूगर्भातील वाढत्या हालचालींचे आणि धोक्याचे स्पष्ट संकेत देणारे आहेत. नांदेड, हिंगोली आणि परभणी या तीन जिल्ह्यांमध्ये मध्यरात्रीनंतर बसलेल्या या धक्क्यांमुळे संपूर्ण परिसर हादरून गेला असून, नागरिकांमध्ये भीतीचे प्रचंड वातावरण निर्माण झाले आहे. सुदैवाने या नैसर्गिक आपत्तीत कोणतीही जीवित अथवा मोठी वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही, ही अत्यंत दिलासादायक बाब असली, तरी या वारंवार होणाऱ्या भूगर्भीय हालचालींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. रात्रीच्या शांततेत बसलेल्या या धक्क्यांमुळे नागरिकांची झालेली झोपमोड आणि सुरक्षिततेसाठी त्यांनी कुटुंबासह केलेली धावपळ ही परिस्थिती किती संवेदनशील आहे याची जाणीव करून देते. भूकंपाचे केंद्र जमिनीच्या आत काही किलोमीटर खोलीवर असणे आणि त्याची तीव्रता रिश्टर स्केलवर मध्यम स्वरूपाची नोंदवली जाणे, हे भूगर्भातील अंतर्गत बदलांचे निदर्शक आहे. यापूर्वीही याच भागात अशाच प्रकारचे तीव्र धक्के जाणवले होते आणि काही गावांमध्ये घरांना व सार्वजनिक इमारतींना तडे गेल्याच्या घटना घडल्या होत्या. एकाच वर्षात अशा घटनांची पुनरावृत्ती होणे ही या संपूर्ण परिसरासाठी एक धोक्याची घंटा मानली पाहिजे. या वारंवार होणाऱ्या कंपनांमागे नेमकी काय शास्त्रीय कारणे आहेत, याचा सखोल अभ्यास भूगर्भशास्त्रज्ञांनी तातडीने करण्याची गरज निर्माण झाली आहे, जेणेकरून भविष्यातील मोठ्या संभाव्य संकटाचा अंदाज घेऊन प्रतिबंधात्मक उपाययोजना करता येतील. निसर्गाच्या अशा अनपेक्षित आपत्तींना तोंड देण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणेवर अवलंबून चालत नाही, तर स्थानिक पातळीवर नागरिकांमध्येही मोठ्या प्रमाणावर जागरूकता असणे आवश्यक आहे. भूकंप झाल्यास काय करावे, घराबाहेर सुरक्षित ठिकाणी कसे जावे, याविषयी आपत्कालीन व्यवस्थापन विभागाने ग्रामीण भागात सातत्याने मार्गदर्शनाचा उपक्रम राबवला पाहिजे. तसेच, या प्रवण क्षेत्रातील घरांच्या बांधकामांच्या रचनेबाबतही आता विचार करण्याची वेळ आली आहे. प्रशासनाने परिस्थितीवर पूर्णपणे लक्ष ठेवून नागरिकांना धीर दिला असला, तरी भविष्यातील सुरक्षेच्या दृष्टीने आपत्कालीन यंत्रणांनी अधिक सतर्क राहणे आणि नागरिकांनी घाबरून न जाता जागरूक राहणे हाच यावरील खरा उपाय आहे.

# अजिंठा लेणीच्या उंबरठ्यावरच तहानलेले गाव ; सावरखेडा-लेनापूरची भीषण पाणीटंचाई; मात्र शासन, प्रशासन झोपेत

हिंदू प्रकाशवार्ता । शेख हक्कानी







**फर्दापूर :** जगभरातील पर्यटक, तसेच मंत्री, आमदार, खासदार, राज्यपाल यांच्या गाड्यांचा ताफा सतत ज्या अजिंठा लेणीच्या दिशेने धावतो, अजिंठा लेणीला भेट देण्यासाठी यांच्याकडे वेळ आहे, मात्र त्याच लेणीच्या हाकेच्या अंतरावर वसलेल्या सावरखेडा, लेनापूर, ग्रुप ग्रामपंचायतीतील नागरिक मात्र थेंब थेंब पाण्यासाठी तडफडत आहेत. या गंभीर समस्येकडे लक्ष द्यायला शासन-प्रशासनाकडे वेळ नाही का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी केला आहे. 1966 साली ग्रामपंचायत स्थापन होऊन 59 वर्षे उलटली, तरी शासन-प्रशासनाच्या बेजबाबदार व हलगर्जी कारभारामुळे या गावांची पाणी समस्या 'जैसे थे' आहे.

ग्रामपंचायतीचे सरपंच, व ग्रामसेवक गणेश गवळे तसेच ग्रामपंचायत यांनी पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विहीर अधिग्रहण व वाढीव पाणी टँकर मंजुरीचा ठराव घेऊन तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्याकडे अनेकवेळा लेखी पाठपुरावा केला. मात्र शासन-प्रशासनाने एकदाही दखल घेतली नाही. कागदोपत्री 'शेरा' मारण्यापलीकडे एक पाऊलही पुढे टाकलेले नाही.

गावच्या विहिरीत नाल्याचे घाण पाणी मिसळत असल्याने पाणी पूर्णतः दूषित झाले आहे. याच पाण्यावर गावकऱ्यांची व लहान मुलांची तहान भागवण्याची वेळ आली आहे. परिणामी साथीच्या आजारांनी डोके वर काढले असून संपूर्ण गावाचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पिण्यासाठी व वापरण्यासाठी थेंबभर पाणी उपलब्ध नसल्याने ग्रामस्थ 8 - 10 किमी दूर फर्दापूर येथून जीआरचे पाणी आणत आहेत. आंघोळीसाठी पाणीच नसल्याने लहान मुले, विद्यार्थी केवळ हातपाय धुवून शाळेत जात आहेत. स्वच्छते अभावी त्वचारोग व इतर आजार बळावले असल्याची वेदना महिलांनी व्यक्त केली.

भीषण पाणीटंचाईमुळे अनेक शेतकरी व पशुपालकांनी गाई, म्हशी, शेळ्या-मेंढ्या पाण्याअभावी इतरत्र स्थलांतरित केल्या आहेत. पावसाळा सुरू होऊनही विहिरी, हातपंप कोरडेठाक असल्याने शेतीही धोक्यात आली आहे.

"तातडीने पाणी उपलब्ध झाले नाही तर संपूर्ण गाव पाण्याच्या शोधात स्थलांतर करेल", असा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे. जगप्रसिद्ध पर्यटनस्थळाच्या शेजारीच नागरिकांना स्थलांतराची वेळ येणे ही शासन-प्रशासनाच्या नाकर्तेपणाची परिसीमा आहे.

राज्यात सध्या 'ट्रिपल इंजिन' सरकार सत्तेत आहे. केंद्र, राज्य व स्थानिक पातळीवर एकाच विचाराचे सरकार असूनही ग्रामीण भागातील मूलभूत पाणीप्रश्न सुटत नसल्याने सरकारच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा गंभीर प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार अपयशी ठरत असल्याचे चित्र आता दिसू लागले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला 'अच्छे दिन' येणार असल्याचे स्वप्न दाखवले होते. मात्र प्रत्यक्षात 'अच्छे दिन' तर दूरच, उलट जनतेवर 'बुरे दिन' आल्याचे चित्र आहे. पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी नागरिकांना जीवघेणी मरमर करावी लागत असून, देशभरात ठिकठिकाणी पाण्यासाठी वणवण फिरणारी जनता दिसत आहे. ही परिस्थिती 'अच्छे दिन'च्या घोषणेला छेद देणारी असल्याची भावना ग्रामस्थांनी बोलून दाखवली.

जगातील पर्यटक, सेलिब्रिटी, व्हीआयपी यांच्या स्वागतासाठी कोट्यवधींचा निधी खर्च करणाऱ्या शासनाला हाकेच्या अंतरावरील गावातील माणसे दिसत नाहीत का? अजिंठा लेणीच्या नावाने पर्यटन वाढवायचे, पण त्याच लेणीच्या पायथ्याशी तहानलेल्या जीवांची पर्वा नाही ? पावसाळ्यातही जर गाव तहानेने व्याकुळ असेल तर उन्हाळ्यात काय परिस्थिती असेल, याचा विचार प्रशासन कधी करणार? *ग्रामस्थ यांची मागणी* तात्काळ विहीर अधिग्रहण करून स्वच्छ पाणीपुरवठा सुरू करावा.

दिवसाला किमान चार टँकरने पाणीपुरवठा नियमित करावा. दूषित पाण्याच्या स्रोतांचे शुद्धीकरण व नाल्याचे पाणी अडवण्याची कायमस्वरूपी उपाययोजना करावी. जलजीवन मिशनअंतर्गत नळ योजना तातडीने पूर्ण करावी.

शासन-प्रशासनाने तात्काळ दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. 59 वर्षे पाणी न देणारे प्रशासन आणि मूलभूत प्रश्न सोडवण्यात अपयशी ठरणारे सरकार आता तरी जागे होणार का,?असा संतप्त सवाल सावरखेडा-लेनापूर वासीय विचारत आहेत.

# घरात घुसून सपासप वार; मुकुंदवाडीत ऐका व्यक्तीची निर्घृण हत्या

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, मुकुंदवाडी परिसरातील राजनगर येथे बुधवारी (८ जुलै) रात्री एक अत्यंत धक्कादायक आणि थरकाप उडवणारी घटना घडली. जुन्या भांडणाची कुरापत काढून आणि सिगारेट ओढण्यासारख्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलाने घरात घुसून रोहिदास दत्तु खकाळ यांच्यावर चाकूने सपासप वार करत त्यांची निर्घृण हत्या केली.

पोलिसांनी दिलेल्या सविस्तर माहितीनुसार, मृत रोहिदास खकाळ हे मुकुंदवाडीतील राजनगर भागात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होते. बुधवारी रात्री सव्वानऊ ते साडेनऊ वाजेच्या सुमारास रोहिदास आणि त्यांच्या पत्नी राणी खकाळ हे घरात असताना, संशयित अल्पवयीन आरोपी त्यांच्या घराबाहेर आला. त्याने घराचा दरवाजा जोरात ठोठावला. रोहिदास यांनी दरवाजा उघडताच, आरोपीने जुन्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. रोहिदास यांना काही समजण्याच्या आतच आरोपीने आपल्यासोबत आणलेला धारदार चाकू काढला आणि थेट हल्ला चढवला. हा हल्ला अत्यंत क्रूर आणि पूर्वनियोजित होता. आरोपीने रोहिदास यांच्या पाठीत ३ ते ४ आणि पोटात ३ ते ४ असे एकूण सुमारे ८ वार सपासप केले. चाकूचे वार वर्मी लागल्याने रोहिदास रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर कोसळले. त्यांच्या पत्नी राणी यांनी आरडाओरडा केला असता, आरोपीने तिथून पळ काढला. शेजाऱ्यांच्या मदतीने गंभीर जखमी रोहिदास यांना तात्काळ शासकीय रुग्णालयात (घाटी) दाखल करण्यात आले, मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली होती. डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले.

पतीवर आपल्या डोळ्यादेखत झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यामुळे पत्नी राणी खकाळ यांना प्रचंड मानसिक धक्का बसला आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या (BNS) संबंधित कलमांनुसार खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच मुकुंदवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी आणि गुन्हे शाखेच्या पथकाने रात्रीच घटनास्थळी धाव घेतली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी रात्रीच तपास चक्रे फिरवली आणि संशयित १५ वर्षीय अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले. कायदा आणि न्याय मंडळाच्या नियमांनुसार आरोपी अल्पवयीन असल्याने पोलिसांनी त्याचे नाव आणि ओळख गोपनीय ठेवली आहे. संशयित आरोपी आणि मृत रोहिदास यांच्यात गेल्या काही दिवसांपासून सिगारेट ओढण्यावरून आणि इतर काही कारणांवरून किरकोळ वाद झाले होते. याच वादाचा राग मनात ठेवून अल्पवयीन मुलाने एवढे टोकाचे पाऊल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. अवघ्या १५ वर्षांच्या मुलाने इतक्या क्रूरपणे हत्या केल्यामुळे शहरातील बाल गुन्हेगारीचा आणि तरुण पिढीतील वाढत्या हिंसक प्रवृत्तीचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर बनला आहे. मुकुंदवाडी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## साधना विठ्ठलाची



### विठ्ठल करी भक्ताशी संवाद

विठ्ठल करी भक्ताशी संवाद
पंढरी म्हणजे तुमचे घर,
इंद्रायणी तुमची आई।
तुम्हीच माझी लेकरं सारी,
आम्ही मायबाप विठ्ठल-रखुमाई॥
हार नको, फुलं नको मला,
नको सोन्याची आरास।
कचरा करू नका, स्वच्छता राखा,
हाच मला तुमचा प्रिय सहवास॥
हातात टाळ, मुखी नाम,
अंतरी ठेवा प्रेमाची शिदोरी।
स्वच्छ वारी, निर्मळ पंढरी,
अशीच घडेल माझी खरी पायी वारी॥
जिथे होई स्वच्छतेची पूजा,
तिथेच माझा कायम सहवास।
जिथे सेवेत भक्ती फुलते,
तिथेच पूर्ण होतो भक्तांचा ध्यास॥
एकच संकल्प माझ्या वारकऱ्यांनी,
परम भक्तीने अखंड धरावा।
कचरामुक्तीची मोहीम सतत चालवा,
स्वच्छतेचाच ध्यास मनी बाळगावा॥
याच वचनांत विठ्ठलदर्शन,
याच कृतीत मायबापाची माया।
तुम्हीच माझी लेकरं सारी,
आम्ही तुमचे जगतमाऊली श्रीविठ्ठलराया॥
साधना म्हणे, ऐका रे भक्तांनो,
माझ्या विठ्ठलाची अमृतवाणी।
स्वच्छतेत दडली खरी भक्ती,
हीच भक्ताची पावन कहाणी॥

**सौ. साधना अशोक घुगे (केहाळकर), परभणी**

# वसंतराव नाईक महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुक पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस.आर. बडगुजर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. महामंडळाच्या पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार, राजे उमाजी नाईक, परमपूज्य गंगानाथ महाराज, ब्रम्हलीन आचार्य दिव्यानंद पुरीजी, श्रीकृष्ण आणि विणकर समाज आर्थिक विकास महामंडळ (उपकंपनी) अंतर्गत बीज भांडवल कर्ज योजना, एक लाख रुपये थेट कर्ज योजना, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना तसेच गट कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येत असून पात्र लाभार्थ्यांना त्यांचा लाभ देण्यात येत आहे. व्याज परतावा योजनेअंतर्गत संपूर्ण कर्ज बँकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी कर्जाचे हप्ते नियमित भरल्यास कमाल १२ टक्क्यांपर्यंतचे व्याज महामंडळामार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. एक लाख रुपये थेट कर्ज योजनेअंतर्गत संपूर्ण कर्ज महामंडळामार्फत देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी दरमहा २ हजार ८५ रुपयांचे ४८ समान मासिक हप्ते नियमित भरल्यास कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. मात्र, थकीत हप्त्यांवर वार्षिक ४ टक्के व्याजदर लागू राहील.

**या योजनांचा लाभ घेण्यासाठी इच्छुकांनी https:**//vnvjntdc.org/ या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी-४३१४०१ येथे किंवा कार्यालयाच्या ०२४५२-२३४५३७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एस.आर. बडगुजर यांनी केले आहे.

# सेलू तालुक्यात विशेष मतदार पुनरिक्षण मोहिमेला वेग; रास्त धान्य दुकानदारांना सहकार्य करण्याबाबत सूचना

हिंदु प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**परभणी,:** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सेलू तालुक्यात गणना फॉर्म वाटप व संकलन मोहिमेला गती देण्यात आली असून, मतदारांमध्ये जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

मौजे डिग्रस जहागीर (ता. सेलू) येथील यादी भाग क्रमांक ४२३ व ४२४ मधील मतदारांना गणना फॉर्म अचूकपणे भरून संबंधित बीएलओंकडे वेळेत जमा करण्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सहायक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार डॉ. शिवाजी मगर, बीएलओ, बीएलओ पर्यवेक्षक आणि निवडणूक विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. गणना फॉर्म वाटप आणि संकलन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्यासाठी सेलू शहरातील रास्त धान्य दुकानदारांची बैठक घेण्यात आली. यावेळी तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी डॉ. शिवाजी मगर यांनी दुकानदारांनी बीएलओंना आवश्यक सहकार्य करावे तसेच नागरिकांनी भरलेले फॉर्म वेळेत जमा करून मोहिमेला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन केले. सेलू शहरातील यादी भाग क्रमांक ३४०, ३४१, ३४३, ३४४ आणि ३७२ या पाच मतदान केंद्रांच्या ठिकाणी तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी भेट देऊन गणना फॉर्म वाटपाच्या कामकाजाचा आढावा घेतला आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

# सर्व शिक्षक संघटनेच्या वतीने विविध मागणीसाठी धरणे आंदोलन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी



**परभणी :** जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनाच्या वतीने शिक्षकांच्या विविध मागण्यासाठी महात्मा फुले पुतळ्यापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत गुरुवार दिनांक 9 जुलै रोजी धरणे आंदोलने करण्यात आले धरणे आंदोलने मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना. देण्यात आले . शिक्षकांचा सहकारी मित्र सर्व कामात समोर असणारा सहशिक्षक रवी शिवानंद स्वामी यांच्या मृत्यूस कारणीभूत अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करून कुटुंबास एक कोटीचा निधी तात्काळ मदत म्हणून देण्यात यावा तसेच इतर राजाप्रमाणे उदाहरणार्थ तामिळनाडू उत्तर प्रदेश तेलंगणा सरकारच्या धरतीवर उत्तीर्ण होण्याच्या नियमांमध्ये शितलता व बदल करण्यात यावे तसेच कार्यरत सेवा जेष्ठ शिक्षकांना टीईटी पास होण्यासाठी सरसकट 60/150(40/)टक्के गुणाची अट लावण्यात यावी शिकवत असलेल्या येतांच्या अभ्यासक्रमानुसार स्वातंत्र्य टीईटी सम कक्ष परीक्षा घेण्यात यावी. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून सेवा जेष्ठ व पदोन्नती पात्र शिक्षकांना पदोन्नतीची संधी द्यावी विद्यार्थी व शाळा विरोधी 15 मार्च 2024 चे संच मान्यता धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा वाचविण्यासाठी 15 मार्च 2024 चे जाचक संच मान्यता धोरण रद्द करण्यात यावी प्राथमिक शिक्षकांना बीएलो कामातून पूर्णपणे मुक्त करण्यात यावे गावात इतर कर्मचारी उपलब्ध असतील तरच शिक्षकांची नियुक्ती करावी प्राथमिक शिक्षकांना बीएलओच्या असैक्षणिक कामातून अंतर जिल्हा बदली प्रक्रिया तात्काळ सुरू करावी खाजगी शाळेचे टप्पा वाढ अनुदान दरवर्षी करण्यात यावे 2005 पूर्वी नियुक्त सर्व कर्मचारी (खाजगी शाळा टप्पा अनुदान ) यांना जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करावी या मागण्यावर शासनाचे तात्काळ चर्चा करून सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनात पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेचे सचिव बाळासाहेब यादव सहसचिव नवनाथ जाधव शिक्षक सेनेचे बाळासाहेब राखे राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे बी आर जाधव सतीश कांबळे महाराष्ट्र शिक्षक संघाचे वसंत इंगोले युवराज अंधारे प्रकाश हरगावकर दीप लोंढे गुलाब हरकळ अशोक लोखंडे हरकळ महाराष्ट्र शिक्षक समितीचे वसंत घोगरे लक्ष्मण चौधरी प्रवीण जोंधळे अरविंद सागर लक्ष्मण गारकर लक्ष्मण बाबर आधी शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपकर निधीतून जिल्हा परिषद शाळा दुरुस्त करा; 14.50 कोटींच्या खर्चावर शिवसेनेचा सवाल

**पान 1 वरून ->**

नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम, वीज व प्रकाशयोजना, स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि इतर मूलभूत गरजांसाठी प्राधान्याने खर्च करावी.

पाठाडे यांनी यावेळी मराठी माध्यमाच्या अनेक शाळा बंद पडत असल्याची खंत व्यक्त केली. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने घटत असून त्यामागे अपुऱ्या भौतिक सुविधा हे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून दिल्याशिवाय पालकांचा जिल्हा परिषद शाळांकडे विश्वास वाढणार नाही, असेही ते म्हणाले.

शेकडो शाळांची दुरवस्था होत असताना १४.५० कोटी रुपयांचा निधी इतर कामांवर खर्च करण्यामागील औचित्य काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. हा विषय अत्यंत गंभीर आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित असल्याने प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांनी या मागणीचा सकारात्मक विचार करून शासनाकडे आवश्यक सूचना पाठविण्याचे आश्वासन दिल्याचे पाठाडे यांनी सांगितले. मात्र लवकर निर्णय झाला नाही, तर या प्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# मुंबई-नाशिक-पंढरपूर टँडेम ब्लाइंड सायकलवारीला उत्साहात प्रारंभ

## दृष्टिबाधित सायकलपटूंच्या जिद्दीला सलाम; एक्सलंट तायक्वांदो अकॅडमीकडून टी-शर्ट वितरण

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**मुंबई :** दृष्टिबाधित खेळाडूंच्या आत्मविश्वासाला बळ देत सामाजिक समावेशकता, समानता आणि दिव्यांग सक्षमीकरणाचा संदेश देणाऱ्या मुंबई–नाशिक–पंढरपूर टँडेम ब्लाइंड सायकलवारी २०२६ चा गुरुवारी मुंबईतील शिवाजी पार्क येथून उत्साहात शुभारंभ झाला. ९ ते १२ जुलैदरम्यान होणाऱ्या या मोहिमेत सहभागी सायकलपटू सुमारे ४५० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत.

राष्ट्रीय तायक्वांदो प्रशिक्षक तथा एक्सलंट तायक्वांदो अकॅडमीचे प्रमुख गजेंद्र गवंडर यांच्या हस्ते नारळ फोडून सायकलवारीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी पद्मश्री उदय देशपांडे, मिड-डेचे वृत्तवैशिष्ट्य विभागाचे संपादक हेमल अशर, दिव्यांग स्पोर्ट्स अँड कल्चरल फाउंडेशनचे अध्यक्ष मनोज कटारिया, सचिव विनोद वडकर आणि कोषाध्यक्ष सरिता कार्डे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमात दृष्टिबाधित आणि सामान्य सायकलपटू एकत्र सहभागी होत सामाजिक समता, दिव्यांग सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देणार आहेत. या मोहिमेस एक्सलंट तायक्वांदो अकॅडमी, मीरा रोड (ठाणे) यांनी सर्व सहभागींसाठी विशेष टी-शर्ट प्रायोजित करून मोलाचे सहकार्य केले. तसेच प्रहार जनशक्तीचे महासचिव रामदास खोत यांनी पावसाळ्याचा विचार करून सर्व सायकलपटूंना रेनकोटचे वाटप केले.

यावेळी गजेंद्र गवंडर म्हणाले, "दिव्यांग खेळाडूंची जिद्द, आत्मविश्वास आणि चिकाटी संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमांना सहकार्य करणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी असून एक्सलंट तायक्वांदो अकॅडमी भविष्यातही अशा सामाजिक आणि क्रीडा उपक्रमांना सातत्याने पाठिंबा देत राहील." या सायकलवारीत आठ पायलट आणि आठ दृष्टिबाधित सायकलपटूंसह एक स्वयंसेवक चालक सहभागी असून, एकूण १८ जणांचा सहभाग आहे. ही मोहीम केवळ क्रीडा उपक्रम नसून दिव्यांग सक्षमीकरण, सामाजिक समता आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा प्रभावी संदेश देणारी जनजागृती चळवळ ठरत आहे. या उपक्रमाचे विविध सामाजिक संस्था, क्रीडा संघटना आणि नागरिकांकडून कौतुक होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## चिशतीया महाविद्यालयात वनमहोत्सव साजरा



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

**खुलताबाद प्रतिनिधी :** चिश्तीया कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय खुलताबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दिनांक १जुलै ते ७ जुलै २०२६ या काळात वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कालावधीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर खुलताबाद व वेरूळ परिसरात विविध देशी वनस्पतींचे वृक्षारोपण केले. जांभूळ, चिंच, आवळा, कडुलिंब इत्यादी देशी व औषधी गुणांनी युक्त असलेल्या वनस्पतींची लागवड व संवर्धनाची जबाबदारी विद्यार्थ्यांनी घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. असिफ झकेरिया यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. वृक्ष लागवड सोबत त्याचे संवर्धन व योग्य त्या नोंदी ठेवण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मोहम्मद मुजाहेद उर् रहेमान . प्रा सुनील जाधव व डॉ.शिल्पा देशपांडे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेच्या विशेष अंमलबजावणी मोहिमेला प्रारंभ

**परभणी:** भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत दि. १९ जून २०२६ ते २० जुलै २०२६ या कालावधीत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे.

ऑगस्ट २०२० मध्ये आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत सुरू झालेल्या या योजनेचा उद्देश पिक काढणीनंतरच्या कृषी पायाभूत सुविधा तसेच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांची निर्मिती करण्यासाठी सवलतीच्या कर्जाची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. या योजनेमुळे शेतमालाचे मूल्यवर्धन, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक आणि विपणनाला चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे.

# लोकसंख्या नियंत्रणासह सुरक्षित मातृत्वावर जिल्हा परिषदेचा भर

### 11 ते 18 जुलै कुटुंब नियोजन पंधरवडा; 81 हजारांहून अधिक गर्भवतींना आरोग्य सेवा, पुरुषांनीही पुढे येण्याचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वाढती लोकसंख्या, मातामृत्यू आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने यंदाच्या जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त व्यापक जनजागृती अभियान हाती घेतले आहे. "दोन जन्मात अंतर, कुटुंब सुदृढ निरंतर" या ब्रीदवाक्याखाली ११ ते १८ जुलैदरम्यान जिल्हाभर कुटुंब नियोजन पंधरवडा राबविण्यात येणार असून, कुटुंब नियोजन, सुरक्षित मातृत्व आणि पुरुष सहभागावर विशेष भर देण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. मिनू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धनोरकर यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणाऱ्या या अभियानात ग्रामीण व शहरी भागात विशेष कुटुंब नियोजन शिबिरे, नसबंदी शस्त्रक्रिया शिबिरे, माता बैठका, ग्रामसभा, बचत गट सभा, प्रभात फेऱ्या, आरोग्य मेळावे आणि जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मार्च २०२६ अखेरच्या HMIS अहवालानुसार जिल्ह्यात ६ हजार ७८४ नसबंदी शस्त्रक्रिया, त्यापैकी ६ हजार ७६६ महिला नसबंदी, १३ हजार ८४३ IUCD सेवा, तसेच अंतरा इंजेक्शन, छाया गोळ्या, गर्भनिरोधक गोळ्या, निरोध, PPIUCD आणि १८ पुरुष नसबंदी करण्यात आल्या आहेत. विविध तात्पुरत्या गर्भनिरोधक साधनांचाही मोठ्या प्रमाणावर लाभ देण्यात आला आहे.

मातृ आरोग्य क्षेत्रातही जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली असून ८१ हजार ३७५ गर्भवती महिलांची नोंदणी, ८८ हजार ५१ महिलांच्या चार किंवा अधिक प्रसूतीपूर्व तपासण्या (ANC) पूर्ण करण्यात आल्या आहेत. गंभीर रक्तक्षयग्रस्त गर्भवतींवर शंभर टक्के उपचार करण्यात आले असून जिल्ह्यातील संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाणही जवळपास शंभर टक्क्यांवर पोहोचले आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये, जिल्हा रुग्णालय, आयुष्मान आरोग्य मंदिरे आणि आशा स्वयंसेविकांच्या माध्यमातून पात्र दाम्पत्यांची RCH 2.0 प्रणालीवर नोंदणी करून सातत्याने समुपदेशन व पाठपुरावा केला जात आहे. प्रसूतीनंतरच्या कुटुंब नियोजन सेवांवरही विशेष भर देण्यात आला आहे.

कुटुंब नियोजन ही केवळ महिलांची जबाबदारी नसून पुरुषांनीही त्यात सक्रिय सहभाग नोंदवावा, पुरुष नसबंदीबाबतचे गैरसमज दूर करून स्वेच्छेने पुढे यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धनोरकर आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवर्गावकर यांनी केले आहे.

## हजरत मोहम्मद मुस्तफा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावरील कथित आक्षेपार्ह वक्तव्याचा विरोध मजलिसे उलेमा शिवना यांच्या वतीने निवेदन



**अजिंठा प्रतिनिधी :** हजरत मोहम्मद मुस्तफा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांच्यावरील कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ सिल्लोड तालुक्यातील शिवना येथील मजलिसे उलेमा शिवना यांच्या वतीने अजिंठा पोलीस ठाण्यात निवेदन देऊन संबंधित वक्तव्य करणाऱ्या नाजिया इलाही यांच्यावर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात म्हटले आहे की, हजरत मोहम्मद मुस्तफा (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) हे जगभरातील कोट्यवधी मुस्लिमांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या संदर्भात करण्यात आलेले कथित आक्षेपार्ह वक्तव्य समाजातील धार्मिक भावना दुखावणारे तसेच सामाजिक सलोखा बिघडविणारे आहे. अशा प्रकारची वक्तव्ये समाजात तेढ निर्माण करू शकतात. त्यामुळे संबंधित व्यक्तीविरुद्ध भारतीय कायद्यानुसार कठोर कारवाई करून अशा प्रकारच्या घटनांना आळा घालावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी उपस्थितांनी शांततेच्या व कायद्याच्या चौकटीत राहून आपला निषेध व्यक्त केला. समाजातील सर्व धर्मांमध्ये परस्पर आदर, बंधुता आणि सौहार्द कायम राहावे, तसेच कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत, यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

या प्रसंगी मुफ्ती मोहसीन , हाफिज जलील कुरेशी,हाफिज एजाज, दौलत मौलाना,हाफिज शफी कुरेशी,हाफिज मोहसीन, हाफिज अकील,हाफिज शाकीर, हाफिज साद, हाफिज जुनेद, हाफिज रियाज,मजलिसे उलेमा शिवनाचे पदाधिकारी, उलेमा, समाजातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदन अजिंठा पोलीस ठाण्याचे अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले

## पशुपालकांच्या दारात भ्रूण प्रत्यारोपण' योजनेचा शुभारंभ

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून उच्च वंशावळीच्या पशुधनाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद सातारा यांच्या सेस फंडातून आणि महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाच्या सहकार्याने 'पशुपालकांच्या दारात भ्रूण प्रत्यारोपणद्वारे गर्भधारणा' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ दि. २५ जून २०२६ रोजी फलटण तालुक्यात करण्यात आला.

या योजनेअंतर्गत उच्च वंशावळीच्या भ्रूणाद्वारे गर्भधारणेसाठी जिल्हा परिषद सातारा मार्फत ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व पशुपालकांना अत्यल्प खर्चात अधिक दूध देणारी व उच्च दर्जाची जनावरे तयार करणे शक्य होणार आहे. हा प्रकल्प महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (एमएलडीबी), नागपूर अंतर्गत कार्यरत भ्रूण प्रत्यारोपण प्रयोगशाळा, ताथवडे (पुणे) यांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. योजनेच्या पहिल्याच दिवशी फलटण तालुक्यात तांत्रिक पथकाच्या देखरेखीखाली १२ गाईंमध्ये भ्रूण प्रत्यारोपणाची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणाचा लढा अधिक तीव्र करणार : सचिन केणी

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला भूमिपुत्रांचे प्रेरणास्थान, राष्ट्रीय नेते स्वर्गीय लोकनेते दिबा पाटील साहेब यांचे नाव मिळालेच पाहिजे, या मागणीसाठी यापुढे लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा लोकनेते दी. बा पाटील भूमिपुत्र सामाजिक संस्था शिवभूमी रायगड -नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र समितीचे कार्याध्यक्ष -सचिन केणी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून दिला असून दिनांक ८ जुलै रोजी पनवेल शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळला लोकनेते दिबा पाटील यांचे नाव देण्यासाठी सामील झालेल्या सर्व आंदोलक, ग्रामस्थ, स्थानिक भूमिपुत्र, विविध सामाजिक संस्था संघटना यांचे सचिन केणी यांनी जाहिर आभार मानले.येत्या ३ महिन्यात नाव न दिल्यास गनिमी काव्याने लढून दिबा पाटील साहेबांचे नाव लावल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा निर्धार सचिन केणी यांनी केला आहे.



सर्व भूमिपुत्र, बंधू आणि भगिनींनी दाखवलेल्या अभूतपूर्व एकतेचे मनापासून आभार.पाऊस, पाणी किंवा कोणतीही परवानगी नसतानाही केवळ आपल्या हक्कासाठी आणि दिबा साहेबांच्या सन्मानासाठी तुम्ही सर्वजण या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झालात. त्यामुळे सर्वांचे पुन्हा एकदा आभार या शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

प्रशासनाला आणि सरकारला आमची नम्र विनंती आहे की, आमच्या संयमाचा अंत पाहू नका. आमचा आगरी-कोळी, कराडी,समाज आणि ५ जिल्ह्यांतील तमाम भूमिपुत्र आपल्या न्याय्य हक्कांसाठी कोणत्याही थरापर्यंत संघर्ष करण्यास सज्ज आहेत!

पुढील आंदोलनातही सर्वांनी अशाच प्रकारे मोठ्या संख्येने एकत्र यावे, हीच विनंती. शेवटचा मिशन येत्या ३ महिन्यात नवी मुंबई विमानतळ गनिमी काव्याने बंद करण्यात येईल त्यावेळेस राष्ट्रीयनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असे नाव जाहीर करण्यास सर्व भूमिपुत्र, केंद्र सरकारला भाग पाडणार.असा इशारा लोकनेते दि. बा पाटील प्रेमी नामकरण संघर्ष समिती तर्फे प्रशासनाला लोकनेते दी. बा पाटील भूमिपुत्र सामाजिक संस्था शिवभूमी रायगड -नवी मुंबई विमानतळ प्रकल्पग्रस्त व भूमिपुत्र समितीचे कार्याध्यक्ष -सचिन केणी यांनी दिला आहे

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात NEP अभ्यासक्रम कार्यशाळा संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि. ९ जुलै :** अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे पदवी तृतीय वर्षाच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) अभ्यासक्रम कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना नवीन अभ्यासक्रमाची रचना,विषय निवड, क्रेडिट प्रणाली,कौशल्याधारित शिक्षण तसेच शैक्षणिक संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार हे होते.प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,पदव्युत्तर समन्वयक डॉ.सी.यू.भोरे,डॉ. रामेश्वर मगर उपस्थित होते.तर NEP समन्वयक डॉ. श्रीकृष्ण परिहार यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विविध तरतुदी, अभ्यासक्रमाची रचना,बहुविषयक शिक्षण,कौशल्य विकास, रोजगाराभिमुखता तसेच विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनीही विविध शंकांचे निरसन करून कार्यशाळेचा लाभ घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुनील चौधरे यांनी केले,तर आभार प्रदर्शन डॉ.सुशील जावळे यांनी केले.

या कार्यशाळेस महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी तसेच पदवी तृतीय वर्षातील मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## सुधारित पीक विमा योजना: 31 जुलै 2026 पर्यंत नोंदणी करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य शासनाने खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना जाहीर केली असून, यामध्ये सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही शेवटची तारीख असेल. नैसर्गिक आपत्ती किंवा हवामानातील बदलांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळावा, या उद्देशाने ही योजना राबवली जात आहे. विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे यांनी सर्व पात्र शेतकऱ्यांना वेळेत अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. अधिसूचित क्षेत्रातील कर्जदार तसेच बिगर कर्जदार, अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे एका अर्जासाठी कमीत कमी ०.१० हेक्टर क्षेत्र असणे गरजेचे आहे. जर शेती भाडेतत्त्वावर घेतली असेल, तर अधिकृत नोंदणीकृत भाडेकराराची कागदपत्रे पीक विमा पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. या योजनेत शेतकऱ्यांवर जास्त आर्थिक बोजा पडणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. उर्वरित विम्याची रक्कम शासन भरणार असून, शेतकऱ्यांना केवळ नाममात्र हिस्सा द्यावा लागेल. खरीप पिकांसाठी एकूण विम्याच्या फक्त २ टक्के, रब्बी पिकांसाठी १.५ टक्के, तर नगदी व बागायती पिकांसाठी ५ टक्के हिस्सा शेतकऱ्यांना भरावा लागेल.योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी अर्ज करताना आपली आणि पिकांची सर्व माहिती अचूक व खरी भरणे आवश्यक आहे, जेणेकरून मंजुरी प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही आणि खऱ्या गरजू शेतकऱ्यांना योजनेचा पूर्ण लाभ मिळेल.विमा अर्ज मंजूर होण्यासाठी शेतकऱ्यां कडे एग्रीस्टॅक फार्मर आयडी (AGRISTACK Farmer ID) आणि डिजिटल पीक सर्वेक्षण (Digital Crop Survey) अंतर्गत पिकांची अचूक नोंदणी असणे अनिवार्य आहे. यासोबतच जमिनीचा ७/१२ आणि ८-अ उतारा, पीक लागवडीचे स्वयं-घोषणापत्र, आधार कार्ड आणि बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे. खरीप हंगामात पेरणीपासून ते काढणीपर्यंतच्या काळात जर नैसर्गिक संकटामुळे उत्पादनात घट झाली, तर पीक कापणी प्रयोगाच्या आधारे नुकसानभरपाई निश्चित केली जाईल.

## राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' ज्येष्ठ कलावंतांना सन्मानाने जगण्याचा आधार

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक-कलाकार सन्मान योजना' अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रात दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या १०० ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेसाठी पात्र लाभार्थ्यांनी *दि. १ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत 'आपले सरकार' पोर्टलवर ऑनलाइन* अर्ज करावेत, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत करण्यात आले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासाची दिलेली प्रेरणा जपत, आयुष्यभर कला आणि साहित्य क्षेत्रासाठी योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना आर्थिक आधार व सन्मान मिळावा, या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांच्या योगदानाचा गौरव करून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यास सहाय्य करणे, हा या योजनेमागील प्रमुख हेतू आहे.

या योजनेसाठी अर्जदाराचे वय ५० वर्षांपेक्षा अधिक असणे आवश्यक असून दिव्यांग कलाकारांसाठी वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता देण्यात आली आहे. त्यामुळे दिव्यांग अर्जदारांसाठी किमान वय ४० वर्षे निश्चित करण्यात आले आहे. अर्जदाराचे कला अथवा साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षांचे योगदान आवश्यक असून वयाने ज्येष्ठ असलेले विधवा, परित्यक्ता आणि दिव्यांग कलाकारांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

## सुप्रसिद्ध गायक सोनु भाऊ साठे यांना बालगंधर्व परिवार पुरस्काराने सन्मानीत

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बालगंधर्व परिवार ट्रस्ट आणि पुणे महानगर पालिकेच्या संयुक्त विद्यमाने पुण्याच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असलेल्या बालगंधर्व रंगमंदिराचा ५८ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक सोनू सुरेश साठे यांना बालगंधर्व परिवार पुरस्कार ट्रस्ट चे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

बालगंधर्व रंगमंदिराचा ५८ वा वर्धापन दिन नुकताच दि. २४, २५, व २६. जून २०२६ दरम्यान पुणे येथे उत्साहात साजरा झाला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या राज्यातील अनेक कलावंताचा 'बालगंधर्व पुरस्कार 'सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक सोनु सुरेश साठे यांनी गायकीच्या क्षेत्रात १६ वर्षे दिलेल्या



योगदानाबद्दल संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानासाठी गौरव करण्यात आला.

यावेळी सोनु सुरेश साठे यांच्या प्रसिद्ध ल लाली लां लाला, छ शिवाजी महाराज,डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे, देवादिकांचे व लोक गीते, जीव माझा लागलाय झुरणीला हे गाणे विशेष गाजले.

या प्रसंगी महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक, सिने कलाकार, लावणी कलावंत असे अनेक नामवंत कलाकार गायिका व बालगंधर्व संपूर्ण टीम उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल सोनु साठे यांचे कै, बाबुरावजी मातंग बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जि. छ. संभाजी नगर, महाराष्ट्र राज्य यांचे पदाधिकारी मा. राजु बी. मातंग, मा. सुभाष बी. मातंग, मा. सुरेश बी. मातंग, मा. भाऊसाहेब एस.कारके, मा. धर्मराज बी. जाधव आदीसह छ. संभाजी नगर येथील व अहिल्यानगर येथील शनिशिंगणापूर येथील सर्व ग्रामस्थांनी सोनु साठे शिष्य परिवाराचे अभिनंदन केले.

## अजिंठा येथील जि.प.प्रा.शाळेतील रिक्त शिक्षक पदे तातडीने भरा; अन्यथा पालक-ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**अजिंठा प्रतिनिधी :** अजिंठा येथील जिल्हा परिषद प्रशाला शाळेमधील रिक्त शिक्षक पदे तातडीने भरावीत, अन्यथा पालक व ग्रामस्थांना आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा मंगेश सनान्से यांनी जिल्हा परिषद प्रशासनाला दिला आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले असून त्याची प्रत विविध विभागीय अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आली आहे.








निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अजिंठा येथील जिल्हा परिषद प्रशाला ही तब्बल ५५ वर्षांची परंपरा लाभलेली शाळा असून ग्रामीण व वंचित भागातील हजारो विद्यार्थ्यांनी या शाळेतून शिक्षण घेतले आहे. मात्र सध्या शाळेत शिक्षकांची तीव्र कमतरता निर्माण झाली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे.

निवेदनानुसार, शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शासनाकडून आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. या शाळेत गरीब, मजूर व मागासवर्गीय समाजातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर शिक्षण घेत असून त्यांच्यासाठी पर्यायी शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

विशेषतः माध्यमिक विभागातील इयत्ता ९ वी व १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, गणित आणि विज्ञान या महत्त्वाच्या विषयांचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. तसेच इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांनाही गणित व विज्ञान विषयांचे शिक्षक नसल्याने त्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले आहे.

सध्या शाळेसाठी मंजूर असलेल्या आठ शिक्षक पदांपैकी प्रत्यक्षात केवळ चार शिक्षक कार्यरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

> **मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ या संपूर्ण प्रकरणाची दखल घेऊन अजिंठा येथील जिल्हा परिषद प्रशाला येथे शिक्षक नियुक्त करावे नसता आठ दिवसात शिक्षकांची पदे न भरल्यास आपल्या कार्यालयासमोर शाळा भरवण्यात येईल.**
>
> **मंगेश सनान्से, माजी विद्यार्थी**
> **ग्राहक संरक्षण समिती जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर**

याशिवाय मुख्याध्यापक पदाचा अतिरिक्त कार्यभार आणि काही शिक्षकांवर बीएलओ तसेच एसआयआरसारख्या इतर प्रशासकीय कामांची जबाबदारी असल्यामुळे विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देणे शक्य होत नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

इयत्ता ५ वी ते १० वीपर्यंतच्या वर्गांमध्ये सुमारे २०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून शिक्षकांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक वातावरण मिळत नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. शाळेमध्ये पिण्याचे पाणी व भोजनाची व्यवस्था उपलब्ध असली तरी गुणवत्तापूर्ण शिक्षणावर परिणाम होत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली आहे.

शिक्षकांच्या कमतरतेमुळे विद्यार्थ्यांची संख्या घटत असून ती सुमारे १७० पर्यंत खाली आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गणित, विज्ञान आणि इंग्रजी विषयांचे शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे अनेक पालकांनी आपल्या पाल्यांचे शाळा सोडल्याचे तसेच काहींनी इतर शाळांमध्ये प्रवेश घेतल्याचेही सांगण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने शिक्षकांची नियुक्ती करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पुढील आठ दिवसांत परिस्थितीत सुधारणा झाली नाही आणि रिक्त पदे भरली गेली नाहीत तर पालक व ग्रामस्थ मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर शाळा भरवून आंदोलन करतील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच गटशिक्षणाधिकारी, सिल्लोड यांना माहितीस्तव व कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

# रेल्वेच्या फर्स्ट एसी कूपमध्ये सजला 'हनिमून सूट'; अतरंगी हौस नडली, डेकोरेटरवर गुन्हा तर रेल्वे कर्मचारी निलंबित!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय रेल्वेच्या प्रवासादरम्यान प्रवाशांना विविध बरे-वाईट अनुभव येत असतात. मात्र, छत्रपती संभाजीनगर येथील एका नवविवाहित जोडप्याने आपल्या 'हनिमून'साठी चक्क धावत्या रेल्वेचाच वापर केल्याचा एक धक्कादायक आणि तितकाच अनोखा प्रकार समोर आला आहे. या जोडप्याने रेल्वेच्या फर्स्ट क्लास एसी कूप (दोन बर्थची स्वतंत्र खोली) डब्याचे थेट 'हनिमून सूट'मध्ये रूपांतर केले. या 'हनीमून ऑन व्हील'च्या आकर्षक सजावटीचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून, नेटकऱ्यांमध्ये यावर उलटसुलट चर्चा रंगली आहे. परंतु, या जोडप्याची ही अतरंगी हौस आता डेकोरेटर आणि रेल्वे कर्मचाऱ्याच्या चांगलीच अंगलट आली आहे. रेल्वे सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी डेकोरेटरवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका रेल्वे कर्मचाऱ्याला तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, हा सर्व प्रकार ६ जुलै (सोमवार) रोजी मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या नंदीग्राम एक्स्प्रेस (गाडी क्र. ११००२) मध्ये घडला. छत्रपती संभाजीनगर येथील एका नवविवाहित जोडप्याने आपला रेल्वे प्रवास



अविस्मरणीय बनवण्यासाठी एक अनोखी शक्कल लढवली. त्यांनी रेल्वेचा फर्स्ट एसी कूप डबा सजवण्यासाठी ऑनलाईन माध्यमातून जालना येथील अजहर शेख या खासगी डेकोरेटरशी संपर्क साधून त्याला कंत्राट दिले होते.

विशेष म्हणजे, या जोडप्याने छत्रपती संभाजीनगर ते जालना असा प्रवास स्वतःच्या कारने केला. दरम्यान, डेकोरेटरला सजावटीसाठी पुरेसा वेळ मिळावा म्हणून त्यांनी जालन्यावरून रेल्वेने पुढील प्रवास सुरू करण्याचे नियोजन केले होते. ६ जुलै रोजी नंदीग्राम एक्स्प्रेस जालना रेल्वे स्थानकावर आली असता, संबंधित डेकोरेटर अजहर शेख याने रेल्वे प्रशासनाची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे थेट फर्स्ट क्लास एसी कोचमध्ये प्रवेश केला. गाडी स्थानकावर थांबलेली असताना, त्याने अतिशय वेगाने कूप डब्याची आतून सजावट केली. या सजावटीमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होता. रंगीबेरंगी फुगे आणि आकर्षक फुलांची रोषणाई - संपूर्ण कूप फुग्यांनी सजवण्यात आला होता.

**मखमली पडदे:** कूपच्या खिडक्या आणि दरवाजावर खास मखमली पडदे लावण्यात आले होते. गुलाबाच्या पाकळ्यांचा वापर- रेल्वेच्या बर्थवर (सीटवर) तांबड्या गुलाबाच्या पाकळ्या पसरवून त्यातून 'आय लव्ह यू' (I Love You) असा रोमँटिक संदेश तयार करण्यात आला होता. या संपूर्ण सजावटीमुळे रेल्वेचा तो डबा एखाद्या फाईव्ह स्टार हॉटेलमधील हनिमून सूटसारखा हुबेहूब दिसत होता.

व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

या 'हनिमून कूप'चा व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड होताच तो वाऱ्यासारखा व्हायरल झाला. अनेकांनी या जोडप्याच्या 'हटको' कल्पनेचे कौतुक केले, तर दुसऱ्या बाजूला बहुतांश सुजाण नागरिकांनी आणि नेटकऱ्यांनी यावर तीव्र आक्षेप घेतला. "चालू गाड्यांमध्ये किंवा रेल्वे स्थानकावर अशा प्रकारे खासगी सजावट करण्याची परवानगी मिळतेच कशी? जर कोणी प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने घातक वस्तू घेऊन आत गेला, तर त्याला जबाबदार कोण?"

असे गंभीर प्रश्न उपस्थित करत नेटकऱ्यांनी रेल्वे प्रशासनाच्या सुरक्षेतील त्रुटींवर बोट ठेवले. तसेच स्वच्छता आणि रेल्वे नियमांच्या दृष्टीनेही चिंता व्यक्त करण्यात

"रेल्वेतील सुरक्षा व्यवस्था आणि प्रवाशांचे नियम सर्वांसाठी सारखेच आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष समिती नेमण्यात आली असून, चौकशीचा अंतिम अहवाल आल्यानंतर संबंधित जोडप्यावर किंवा इतर दोषींवर रेल्वे कायद्यानुसार पुढील कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल," असे रेल्वे प्रशासनाच्या सूत्रांनी स्पष्ट केले आहे.

हा प्रकार सोशल मीडियाच्या माध्यमातून रेल्वे प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आला. रेल्वेच्या कोचमध्ये अशा प्रकारे अनधिकृत प्रवेश करणे आणि अंतर्गत बदल करणे ही गंभीर सुरक्षा चूक मानली जाते. त्यामुळे रेल्वे प्रशासनाने तातडीने चक्र फिरवून कडक कारवाईचे पाऊल उचलल डेकोरेटरवर गुन्हा दाखल. रेल्वे पोलिसांनी रेल्वेचे नियम धाब्यावर बसवून प्रवाशांच्या सुरक्षेला बाधा आणल्याप्रकरणी डेकोरेटर अजहर शेख (रा. जालना) याच्याविरुद्ध जालना रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. रेल्वे कर्मचारी

# डीएपी खताच्या 800 मे.टन साठ्याच्या वितरणास परवानगी

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी, :** खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना डीएपी खताचा पुरेसा पुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी संरक्षित ठेवण्यात आलेल्या डीएपी खताच्या साठ्याचे वितरण करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली आहे.

कृषी विभागामार्फत जिल्ह्यासाठी युरिया व डीएपी खताचा संरक्षित साठा महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन, मुंबई आणि महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ, नांदेड या नोडल संस्थांमार्फत उपलब्ध करून देण्यात आला होता. जिल्ह्यातील पेरणीची स्थिती आणि शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून हा संरक्षित डीएपी खताचा साठा आता वितरित करण्यात येणार आहे.

तालुकानिहाय डीएपी खताचे वितरण पुढीलप्रमाणे करण्यात येणार आहे . परभणी – १०० मे.टन, जिंतूर – १०० मे.टन, पाथरी – ९० मे.टन, मानवत – ९० मे.टन, सेलू – ९० मे.टन, सोनपेठ – ८० मे.टन, गंगाखेड – ९० मे.टन, पालम – ८० मे.टन आणि पूर्णा – ८० मे.टन. अशा एकूण ८०० मे.टन डीएपी खताचा संरक्षित साठा जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील अधिकृत खत विक्रेत्यांकडे उपलब्ध होणार असून तो तात्काळ शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे.

सध्या जिल्ह्यात युरिया ९,९८९ मे.टन, डीएपी ४०२ मे.टन, एनपीके १६,३२५ मे.टन आणि एसएसपी ८,४७१ मे.टन इतका रासायनिक खतांचा साठा उपलब्ध असून खताचा पुरेसा पुरवठा असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

खत खरेदी करताना अधिकृत पावती घ्यावी आवश्यक तेवढेच खत खरेदी करावे तसेच अफवा किंवा चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नये, खताचा पुरेसा साठा उपलब्ध असुन घाबरुन अतिरिक्त खरेदी करण्याची आवश्यकता नाही. असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.

# राम मंदिर देणगी प्रकरणावर शिवसेनेचा आक्रमक; महंत रामगिरी महाराजांना निवेदन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरातील देणगी व आर्थिक व्यवहारांतील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी शिवसेनेने राज्यभर सुरू केलेल्या 'रामरक्षा' आंदोलनाला छत्रपती संभाजीनगरात वेग आला आहे. गुरुवारी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने सरलाबेठ येथील महंत रामगिरी महाराज यांची



भेट घेऊन निवेदन सादर केले.

महंत रामगिरी महाराज यांना निवेदन देताना शिवसेना उपनेते सुभाष पाटील, शिक्षक सेनेचे पद्माकर इंगळे, तालुकाप्रमुख मनाजी पाटील मिसाळ, विधानसभा संघटक गिरीष चपळगावकर, वीरभद्र गादगे, सुनीता देव, आशा दातार, रेणुका जोशी, अरुणा भाटी, मीरा देशपांडे, कांता फसाटे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी चंद्रकांत खैरे म्हणाले की, हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने हजारो शिवसैनिकांनी रामजन्मभूमी आंदोलनात सहभाग घेतला होता. त्या संघर्षातून उभारलेल्या श्रीराम मंदिराबाबत आता देणगीतील कथित गैरव्यवहाराचे आरोप समोर येत असल्याने रामभक्तांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. या प्रकरणातील प्रत्येक पैशाचा

## आज वेरूळ येथे शांतीगिरी महाराजांची भेट

'रामरक्षा' आंदोलनाची सुरुवात जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांना निवेदन देऊन करण्यात आली होती. या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात शुक्रवारी वेरूळ येथील आश्रमात महामंडलेश्वर शांतीगिरी महाराज यांची चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ भेट घेऊन त्यांनाही निवेदन सादर करणार आहे. संत-महंतांच्या माध्यमातून रामभक्तांच्या भावना शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न शिवसेनेकडून केला जात असल्याचे पक्षाच्या वतीने सांगण्यात आले.

# डोंबिवलीतील डॉक्टरांवरील हल्ल्याचे 'घाटी'त तीव्र पडसाद

## काळ्या फिती लावून निवासी डॉक्टरांचे आंदोलन; रुग्णसेवा अबाधित ठेवत हिंसाचाराविरोधात एकजुटीचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** डोंबिवली येथील शासकीय रुग्णालयात डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे गुरुवारी निवासी डॉक्टरांनी काळ्या फिती लावून तीव्र आंदोलन केले. 'मार्ड' छत्रपती संभाजीनगर आणि 'फायमा इंडिया' यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या आंदोलनातून डॉक्टरांवरील वाढत्या हिंसाचाराविरोधात संतप्त भावना व्यक्त करण्यात आल्या.



आंदोलन करतानाही डॉक्टरांनी रुग्णसेवा खंडित होणार नाही, याची विशेष काळजी घेतली. बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), आंतररुग्ण विभाग (आयपीडी), आपत्कालीन विभाग तसेच सर्व वैद्यकीय सेवा नेहमीप्रमाणे सुरू ठेवून काळ्या फिती लावत निषेध नोंदविण्यात आला. त्यामुळे रुग्णांवर कोणताही परिणाम झाला नाही.

समुदाय वैद्यक विभागाच्या नियमित उपक्रमांतर्गत घराघरांत जाऊन आरोग्य सेवा देणाऱ्या निवासी डॉक्टरांनीही काळ्या फिती लावून डोंबिवलीतील घटनेचा निषेध व्यक्त केला. डॉक्टर समाजसेवा बजावत असतानाच त्यांच्यावर होणाऱ्या हल्ल्यांविरोधात कठोर भूमिका घेण्याची वेळ आल्याचा संदेश या आंदोलनातून देण्यात आला.

आंदोलनादरम्यान हल्लेखोरांवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई करावी, डॉक्टरांना सुरक्षित कार्यपरिसर उपलब्ध करून द्यावा आणि राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व 'फायमा'चे सहअध्यक्ष डॉ. स्वप्निल केंद्रे, 'मार्ड' छत्रपती संभाजीनगरचे अध्यक्ष तथा 'फायमा' नॅशनल एक्झिक्युटिव्ह सदस्य डॉ. चैतन्य ढावरे आणि 'मार्ड'चे सरचिटणीस डॉ. शुभम सावळकर यांनी केले. आंदोलनात मोठ्या संख्येने निवासी डॉक्टर, इंटर्न आणि वैद्यकीय कर्मचारी सहभागी झाले. डोंबिवलीतील घटनेनंतर राज्यभरातील वैद्यकीय क्षेत्रात संतापाची लाट असून, डॉक्टरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. 'घाटी'तील आंदोलनातूनही डॉक्टरांवरील हल्ले रोखण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

# मेरा युवा भारत उपक्रमातंर्गत युवा नोंदणी अभियानास गती; जिल्हास्तरीय बैठक संपन्न

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी,:** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मेरा युवा भारत' उपक्रमाअंतर्गत युवा नोंदणी अभियानाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी तथा मेरा युवा भारत जिल्हा सल्लागार व समन्वय समितीचे अध्यक्ष संजयसिंह चव्हाण हे होते. प्रारंभी जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी मेरा युवा भारत संकेतस्थळ, उपक्रमाची उद्दिष्टे, युवकांसाठी उपलब्ध स्वयंसेवा संधी, अनुभवाधारित शिक्षण कार्यक्रम तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या युवा नोंदणी अभियानाची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. यावेळी युवा नोंदणी अभियानासाठी तयार करण्यात आलेल्या जनजागृती पोस्टरचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी अभियानाची प्रसिद्धी इंग्रजीसोबतच मराठी आणि हिंदी भाषेत प्रभावीपणे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सक्रिय सहभाग घेऊन जास्तीत जास्त युवकांची मेरा युवा भारत संकेतस्थळावर नोंदणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक शाखेनुसार उपलब्ध स्वयंसेवा, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख संधींबाबत माहिती देण्यावरही त्यांनी भर दिला.

# मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळाच्या मागणीला वेग; केंद्राला तातडीने प्रस्ताव सादर करण्याची भुमरेंची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यासाठी स्वतंत्र रेल्वे मंडळ (विभाग) स्थापन करण्याच्या मागणीला खासदार संदिपान भुमरे यांनी पुन्हा जोर दिला असून, यासंदर्भातील सविस्तर व्यवहार्यता अहवाल तयार करून केंद्र शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव आणि रेल्वे मंडळाचे अध्यक्ष सतीश कुमार यांना पत्राद्वारे केली आहे.

भुमरे यांनी पत्रात नमूद केले आहे की, सध्या मराठवाड्यातील रेल्वे व्यवस्था




दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाअंतर्गत असल्याने स्थानिक गरजा, नवीन रेल्वे प्रकल्प, स्थानक विकास आणि प्रवासी सुविधांबाबत निर्णय प्रक्रियेला विलंब होत आहे. त्यामुळे मराठवाड्याच्या रेल्वे विकासाला अपेक्षित गती मिळत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

स्वतंत्र रेल्वे विभाग स्थापन झाल्यास नवीन रेल्वेमार्ग, दुहेरीकरण, विद्युतीकरण, स्थानकांचा विकास आणि प्रवासी सुविधा अधिक वेगाने विकसित होतील. तसेच अजिंठा, वेरूळ, दौलताबाद, पैठण, परळी वैजनाथ, तुळजापूर आदी पर्यटनस्थळांना सक्षम रेल्वे जोडणी मिळेल. शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रासह मालवाहतूक, लॉजिस्टिक सुविधा, रोजगारनिर्मिती आणि प्रशासकीय कार्यक्षमता वाढून मराठवाड्याच्या सर्वांगीण रेल्वे विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास खासदार भुमरे यांनी व्यक्त केला.

# पाणीपुरवठ्यावर आयुक्तांचा 'अल्टिमेटम'; आज दुपारी 12 पर्यंत पंपिंग सुरूच करा

## कामात दिरंगाई करणाऱ्या एजन्सीला फटकारले; 'डेडलाईन संपली

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील पाणीपुरवठा ठप्प झाल्याने नागरिकांना होत असलेल्या गैरसोयीची गंभीर दखल घेत महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित एजन्सी आणि अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. "कोणत्याही परिस्थितीत आज दुपारी १२ वाजेपर्यंत पंपिंग सुरू झालीच पाहिजे. यापुढे कोणतीही दिरंगाई किंवा सबब सहन केली जाणार नाही," असा स्पष्ट इशारा देत त्यांनी काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले.

स्मार्ट सिटी कार्यालयात



झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत जॅकवेल दुरुस्ती, बंद असलेली पंपिंग व्यवस्था, नवीन व्हॉल्व बसविण्याची प्रक्रिया आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी सुरू असलेल्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीत आयुक्तांनी संबंधित एजन्सी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (एमजेपी) आणि महापालिकेच्या अभियंत्यांना प्रत्यक्ष स्थळी जाऊन कामाचा वेग वाढविण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान एजन्सीच्या प्रतिनिधींनी विलंबाची कारणे सांगण्याचा प्रयत्न केला. मात्र, आयुक्तांनी ती कारणे फेटाळून लावत, "तुमची मुदत आधीच संपली आहे. आता कारणे नकोत, नागरिकांना पाणी मिळणे महत्त्वाचे आहे. आधी काम पूर्ण करा," अशा शब्दांत एजन्सीला फटकारले. तसेच 'एप्रोच चॅनेल'चे कामही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.

आयुक्तांनी नवीन व्हॉल्वच्या पुरवठ्यावर नियमित लक्ष ठेवण्याच्या, खराब व्हॉल्वची संपूर्ण जबाबदारी संबंधित एजन्सीवर निश्चित करण्याच्या तसेच नवीन व्हॉल्व आल्यानंतर पाच दिवसांच्या आत ते बदलण्याचे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. आवश्यकतेनुसार नियोजित शटडाऊन घेऊन काम पूर्ण करण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला विशेष कार्यकारी अधिकारी ए. बी. देशमुख, के. एम. फालक, अतिरिक्त शहर अभियंता अनिल तनपुरे, कार्यकारी अभियंता सचिन वाईकर, सर्व कनिष्ठ अभियंते, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार रामधन जाधव, योगेश काळे तसेच जीव्हीपीआरचे सिद्धांत ठाकरे, आशुतोष पांडेय आणि एमजेपीचे राम नारायण यांच्यासह संबंधित अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

# ICTPL सीएफएस परवाना तातडीने पूर्ववत करा; आयटीपीएल गेटवर 850 कामगारांचा एल्गार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** ICTPL (International Cargo Terminal Pvt. Ltd.) च्या सीएफएस परवान्याच्या निलंबनाविरोधात दिनांक ९ जुलै २०२६ रोजी आयटीपीएल गेटवर सुमारे ८५० कर्मचारी, कामगार, कंत्राटी मजूर आणि वाहनचालक यांनी एकत्र येत जोरदार आंदोलन केले. या आंदोलनात विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते मोठ्या संख्येने सहभागी झाले.






आंदोलनादरम्यान झालेल्या सभेत शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, तसेच अन्य मान्यवरांनी कामगारांना संबोधित केले. त्यांनी सीएफएस परवान्याच्या निलंबनामुळे शेकडो कामगारांच्या रोजगारावर गदा आली असून त्यांच्या कुटुंबांपुढे उपजीविकेचे गंभीर संकट उभे राहिल्याचे सांगितले.

उपस्थित मान्यवरांनी केंद्र व राज्य सरकार, सीमाशुल्क (Customs) प्रशासन आणि संबंधित विभागांना तातडीने हस्तक्षेप करून ICTPL सीएफएसचा परवाना पूर्ववत करण्याची मागणी केली. कोणत्याही प्रशासकीय किंवा कायदेशीर प्रक्रियेचा फटका निरपराध कामगारांना बसू नये, रोजगार सुरक्षित ठेवावा आणि सीएफएसचे कामकाज लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणीही करण्यात आली.

आंदोलनादरम्यान कामगारांनी एकजुटीचे दर्शन घडवत घोषणाबाजी केली आणि "कामगारांना न्याय मिळालाच पाहिजे", "सीएफएस परवाना तातडीने सुरू करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. उपस्थित नेत्यांनी संघर्ष शेवटपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करत कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.सदर आंदोलन शांततेत पार पडले. शेवटी सर्व कर्मचारी, कामगार, मजूर आणि वाहनचालकांनी एकमुखाने ठराव मंजूर करून ICTPL सीएफएसचा परवाना पूर्ववत होईपर्यंत लोकशाही मार्गाने संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी शिवसेना जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर, काँग्रेस तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, शिवसेना तालुका संघटक बी एन डाकी, जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकूर, पंचायत समिती सदस्य प्रारंभी गावंड, कविता पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते रमाकांत पाटील, ॲड पर्जन्य म्हात्रे, शिवसेना विभाग प्रमुख भूषण ठाकूर, भारतीय जनता पार्टीचे उरण उप तालुका अध्यक्ष मुकुंद गावंड, भारतीय जनता पार्टीचे विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील,माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन गावंड,शिवसेना प्रणित विद्यार्थी सेना रायगड जिल्हा संघटक रोहिदास पाटील,शिवसेना द्रोणागिरी शहर प्रमुख जगजीवन भोईर,सामाजिक कार्यकर्ते रुपेश पाटील यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व कामगार व शेतकरी वर्गही यावेळी मोठया संख्येने उपस्थित होते.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911